“आपले मंडळ”

॥ *Maharashtra Mandal of Detroit* ॥

# स्नेहबंध

# संक्रांत

## विशेषांक



जानेवारी २०२५

# Happy Makar Sankranti

Avinash, Hema, Ruchi, Akash and Adarsh Rachmale



The N. Rachmale Foundation

Prosperity Through Service

Avinash and Hema Rachmale

SKY Group Inc.

Sky Group Grand, LLC.
Real Estate Group


LAKESHORE HEALTHCARE GROUP LHG

Lakeshore Healthcare Group, Inc.
Nursing Home & Managed Care

LAKESHORE GLOBAL

Lakeshore Global
Infrastructure Contractors

www.therachmalefoundation.org | www.Lgccorp.com




# From
# Prabhakar Patil & family

# अनुक्रमणिका


| अनु.क्र. | लेख / कविता - नाव | लेखक / कवी | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| १ | अध्यक्षांचे मनोगत अर्थातच वर्षाचे विचार! | वर्षा पाथरे | ५ |
| २ | टेलिपथी | बागेश्री नाईक | १२ |
| ३ | कँटन शाळा संक्रांतोत्सव २०२४ | अभिजित जोगदेव | १९ |
| ४ | हस्तलेखन | रेवा जोगदेव | २० |
| ५ | मनोबळ कविता | डॉ. वीणा शाह | २६ |
| ६ | गंमत | उमेश पवार | ३३ |
| ७ | सुट्टीतील उपक्रम | निहिरा नाईक (ट्रॉय मराठी शाळा) | ४१ |
| ८ | हा चंद्रधनूचा खेळ | डॉ. वीणा शाह | ४७ |
| ९ | मी मराठी My मराठी | विभावरी देशपांडे | ५३ |


लेखकांना, चित्रकारांना आणि वाचकांना संपूर्ण मतस्वातंत्र्य देण्यात आले आहे. लेखांतून व चित्रांतून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक किंवा आपण सहमत असूच असे नाही, तेंव्हा आपण हा अंक केवळ "मनोरंजनासाठी" आहे अशी अपेक्षा ठेवून वाचावा, ही विनंती!


**संपादक :** ज्योत्स्ना दिवाडकर

**मुखपृष्ठ:** गायत्री औंधकर

**रचना व मांडणी :** अश्विनी राहुल पारठे

# अध्यक्षांचे मनोगत

**नमस्कार मंडळी,**

**तुम्हा सर्वांना नवीन वर्षाच्या आणि संक्रांतीच्या शुभेच्छा!**

**तिळगूळ घ्या गोड बोला!**



उदय आणि मी १९९० मध्ये मिशीगनला आलो. त्या वेळेला आमच्या इथे फार ओळखी नव्हत्या. सुभेदार आणि परांजपे कुटुंब ओळखीचे होते. त्यांनी आम्हाला 'महाराष्ट्र मंडळ ऑफ डेट्रॉईट'बद्दल माहिती दिली. आम्ही लगेचच मेम्बरशिप घेतली आणि कार्यक्रमाला यायला लागलो. आमच्या मंडळातल्या बऱ्याच लोकांशी ओळखी व्हायला लागल्या. लवकरच शैला फाटक आणि तिच्या मैत्रिणी भेटल्या. शैला तेव्हा महाराष्ट्र मंडळाची अध्यक्षा होती.

ह्या सगळ्या बायकांमध्ये खूप उत्साह होता. आम्हीदेखील त्यांना मदत करायला लागलो. १९९१ मध्ये शेखर चिटणीसच्या कार्यकारिणीत सामील झालो. तेव्हा प्रमिलाताई सरदेशपांडे उपाध्यक्षा होत्या. त्या अगदी सहजासहजी सर्व कामं सांभाळून घायच्या. सगळ्यांना एकत्र करून समजावून सांगायच्या. मी स्वतः त्यांच्याकडून खूप शिकले. MMD मध्ये खूप जवळचे मित्र आणि मैत्रिणी झाल्या. ११९० ते २०१५ पर्यन्त आम्ही वेगवेगळ्या टीम्समध्ये काम केलं. २०१६ पासून बॅकस्टेज आणि सेट बिल्डिंग मध्ये खूप इंटरेस्ट वाटला म्हणून पुढची नऊ वर्ष त्याच टीम मध्ये 'लीड' म्हणून काम केलं. २०१७ मध्ये, BMMच्या अधिवेशनात आम्हा सर्वांचा एकदम जवळचा बॉण्ड निर्माण झाला. आमची दोन मुलं(चिराग आणि रोशन) सुद्धा मंडळातच वाढली. त्यांना सगळ्यात जास्त मजा आली ती BMMच्या अनेक डान्स प्रोग्रॅम्स, गीत रामायण आणि MMD च्या गणपतीत!

ह्या वर्षी जेव्हा मला MMDची अध्यक्षा व्हायची संधी मिळाली तेव्हा मला आनंद झाला, पण त्याचबरोबर ही मोठी जबाबदारी आहे ह्याची जाणीवही होती. मी लगेचच माझ्या कार्यकारणीमध्ये कोण कोण सहभागी होईल याचा विचार करु लागले. ह्या दरम्यान MMDच्या बऱ्याच नव्या, जुन्या आणि जाणत्या सदस्यांनी मला मदत करायला हात पुढे केला. आमच्या कार्यकारिणीमध्ये वेगवेळ्या क्षेत्रात अनुभव असलेले सभासद आहेत - रेणुका कोरान्ने ओक, देवेंद्र चितळे, प्राजक्ता केतकर, संपदा बुरांडे व रघु नीलकांतन; युवा अध्यक्ष प्रत्युष नीलकांतन आणि उपाध्यक्ष तनिका देशपांडे आहेत. सगळे जण डिसेंबरच्या सुट्टीनंतर परत नव्या उत्साहाने तयार आहेत. आम्ही सर्व मिळून तुमच्यासाठी झक्कास कार्यक्रम आणायचे बेत आखत आहोत.

आजच्या संक्रांतीच्या कार्यक्रमाच्या Program Managers आहेत ऋतुजा कांबळे -औंधकर आणि निकिता चौगुले. ह्या दोघी बरेच दिवस मंडळाच्या स्वयंसेवकांच्या मदतीने जोरदार तयारी करीत आहेत.

त्यांच्याच मेहनतीमुळे आणि काटेकोर नियोजनामुळे आपण आजच्या कार्यक्रमाचा आनंद घेऊ शकत आहोत! सर्वांचाच हातभार लागलेला आहे परंतु भारतातून इथे वस्तू आणायला बरेच कष्ट पडतात म्हणून काही व्यक्तींचा खास उल्लेख करत आहे:

- आजच्या गुळपोळ्या, तिळगूळ आणि हलवा अमिता जोशी आणि दीपा इंगळे ह्यांनी 'जोशी स्वीट्स, पुणे यांच्याकडून मागविल्या आहेत.
- हळदी कुंकू आणि वाण पुण्यातील एका महिला उद्योजिकेकडून रेणुका कोरान्ने ओक, प्रणव औंधकर (आणि मी!) निवडून आणले आहे.
- गिरनारची चहा पावडर आणायला मदत केली आहे वैभव नरवणकर, देवेंद्र चितळे आणि साईनाथ जाधव यांनी!

मधुरा गोखले, शुभदा कामेरकर, आणि तनुजा शिंगणे ह्यांचे मनापासून आभार की त्या एवढ्या थंडीच्या दिवसात आपल्याकडे यायला कबूल झाल्या!
पोट धरून हसा आणि पोटभर जेवा!
धन्यवाद!



आपली आदरपूर्वक,
**वर्षा पाथरे**
*2025 MMD President*

## Our MMD Executive Team Wishes You All

# मकर संक्रांती

**निमित्त आपणास व आपल्या परिवारास हार्दिक शुभेच्छा...!**



**Varsha Pathre**
*President*



**Devendra Chitale**
*Vice-President*



**Renuka Koranne-Oak**
*Vice-President*



**Prajakta Ketkar**
*Secretary*



**Sampada Burande**
*Treasurer*



**Reghu Neelakantan**
*Treasurer*


# Pradeep Kokate & Family wishes you all




Happy
Makar
Sankranti

MAYA PREP


Curriculum Based Kathak
Certified by
Tilak Maharashtra
Vidyapeeth, Pune
ASMI
Dance Academy
For Inquiries Contact
Anagha Huprikar
(Founder of ASMI Dance Academy)
248-701-5275 | asmidanceacademy@gmail.com
Batches at:
Rochester Hills | Troy | Novi | Okemos (Lansing)



Happy Makar Sankranti
from

meijer



# Rahul Parthe
# & Family
## Wishes you






# Dr. Bhogaonkar and family Wish you all

SAT Math & English Test Prep Classes

The EDucation ENrichment Center

www.ed-en-center.com
248.528.1455
2328 Livernois Road, Troy, MI 48085

We have experienced teachers provide a structured approach to help students learn new math concepts, improve language arts abilities, and boost test scores

**ACT/SAT Test Prep**


- ACT Prep course
- SAT Prep course
- Test practice and reviews

**Math**

- K-5 Math
- Pre-Algebra
- Algebra I
- Algebra II
- Geometry
- Trigonometry
- Pre-Calculus
- Calculus

**English**


- K-12 Language Arts
- Grammar
- Reading Comprehension
- Writing
- Vocabulary



# Telepathy एक अद्भुत अनुभूती



आयुष्यात कधी कधी अनपेक्षित अश्या काही घटना घडतात की आपलं संपूर्ण आयुष्यच बदलून जात. आणि मग आपण त्या गोष्टी का घडल्या ह्याचा विचार करायला लागतो. तसंच काहीसं माझ्या बाबतीत घडलं आणि ध्यानीमनी नसताना मी Telepathy शी जोडले गेले. Telepathy म्हणजे नक्की काय, ती कशी करतात ह्याची माहिती घेण्याचा प्रयत्न केला. योगायोगाने पुण्यात Telepathy करणाऱ्या एका मैत्रिणीची ओळख झाली. तिनेच मला ह्या नवीन जगाची ओळख करून दिली. तिच्या सल्ल्याने मी Telepathy चा Course केला आणि खरंच माझाच माझ्यावर विश्वास बसत नव्हता की मी माझ्याच घरात बसून जगाच्या पाठीवर कुठेही राहणाऱ्या प्राणी, वनस्पती, घर व जमीन/जागा यांच्या बरोबर 'संवाद' साधू  शकते. अर्थात ह्या साठी काही नियम, अटी असतात त्या पाळाव्याच लागतात. वाट्टेल त्या प्राण्याशी व वनस्पतींशी तुम्ही थेट संवाद साधू शकालच असं नाही.



Telepathy म्हणजे प्रत्यक्षात न भेटता मनातल्या मनात दुसऱ्या कोणाशीही संवाद साधणे.

टेलिपथीचा वापर करून आपण प्राण्यांशी बोलू शकतो ज्याला 'ॲनिमल telepathic कम्युनिकेशन' असं म्हणतात, किंवा झाडाझुडपांशी बोलू शकतो त्याला 'प्लांट कम्युनिकेशन' म्हणतात.
याचबरोबर आपण कुठल्याही जमिनीशी, शेताशी, प्लॉटची किंवा घराशीसुद्धा बोलू शकतो आणि आपल्याला ज्या समस्या असतात त्याचं समाधान आपण घराला विचारून करून घेऊ शकतो.
प्राणीसंवादाचा सराव करत असताना मला खूपदा मजेशीर अनुभव येतात. त्यांचा मूड असेल तरच ते आपल्याशी बोलतात बरं का, आणि त्यात जर Female असेल तर काही विचारायलाच नको!
एकदा असंच एका मैत्रिणीच्या कुत्र्याशी मी connect केलं होतं. तिने मला जे प्रश्न दिले होते ते मी त्या कुत्र्याला विचारत होते.

त्यात तिने मला विचारायला सांगितलं होतं की गेले काही दिवस तो तिने दिलेलं काहीच खात नव्हता.
मी त्याला विचारलं की का खात नाही आहेस तू, तिने दिलेलं जेवण?
तर तो म्हणाला की त्यांच्याकडे कोणीतरी पाहुणे आले होते, त्यांच्यासमोर ती त्याला ओरडली होती, त्याचा त्याला राग आला होता!
मी त्यालाच विचारलं, तुझा राग कसा घालवायचा?
त्याने सांगितले, 'तिला मला sorry म्हणायला सांग आणि माझ्या आवडीचा खाऊ द्यायला सांग मगच माझा राग जाईल'.
मी हे माझ्या मैत्रिणीला ऐकवल्यावर तिने कबूल केले, 'हो मी त्याला ओरडले होते पाहुण्यांसमोर! कारण उगाच तो त्रास देत होता.'

नवीन नवीनच Telepathy शिकत आहे.  practice तर must आहे म्हणून बरं वाटतं नसताना पण एका मांजराशी संवाद साधला, तर तिने मलाच प्रश्न विचारायला सुरवात केली.
तू कशी आहेस? मला तू ठीक वाटत नाहीस, काय होतंय तुला?
मग मी तिला सांगितलं की मी आज खूप थकले आहे, डोकं दुखत आहे.
ती म्हणाली आत्ता औषध घे आणि आराम कर.  आपण नंतर बोलू.
असे खूप वेगवेगळे अनुभव येतात.
Communication झाल्यावर त्याची उत्तरं मी जेव्हा त्या त्या व्यक्तीला देते, आणि ती व्यक्ती त्यावर शिक्कामोर्तब करते  तेंव्हा मला एक समाधान मिळतं की खरंच आपल्याला हे जमतयं. आपण हे करू शकतो हा आत्मविश्वास देखील मिळतो.




संवादातून मला अनुभूति होती, डोळ्यापुढे त्या प्राण्याचा किंवा झाडाचा फोटो ठेवायचा, सर्व अवधानं एकत्रित करून त्या जीवाशी संपर्क साधायचा. समजा एखाद्या कुत्र्याला एक विशिष्ट पदार्थ आवडत नसेल तर अशा वेळी माझी 'वास' ही संवेदना जागी होते.

एकदा मी माझ्याच घरातल्या कुंडीतल्या एका झाडाशी संवाद साधला आणि त्याला विचारलं की तुझी वाढ का होत नाही? काय करायला पाहिजे?
त्याने मला सांगितलं काही बदल अपेक्षित आहेत.
इतकंच नाही तर माझ्या झाडाने मलाच सल्ला दिला, 'तू सगळ्यांचा विचार करतेस, कोणाला वाईट वाटणार नाही ना, कोणी दुखावले तर जाणार नाही इतका तू विचार करतेस पण तुझ्या मनाचं काय'?
'जरा स्वःताकडे लक्ष द्यायला शिक कधीतरी' असा प्रेमळ सल्ला मला दिला!
एका मैत्रिणीच्या चिंचेच्या झाडाबरोबर संवाद साधला. तिचे जे काही प्रश्न होते ते विचारून झाल्यावर मी त्या झाडाला म्हणाले, 'तू एवढे वर्ष जुना आहेस (८० वर्ष तग धरून राहिलेला वृक्ष होता तो!). तर तू खूप पावसाळे पाहिले असशील.' त्याने त्याची कथा सांगितली! एकदा वादळात ते झाड पडलं होतं आणि परत तिथेच त्याला पालवी फुटली आणि ते पुन्हा उभे राहिले.
वर त्यानेच मला सल्ला दिला की कितीही वादळं आली आयुष्यात तरी डगमगू नकोस, धीराने परिस्थितीला सामोरी जा.

अजून बराच मोठा पल्ला गाठायचा आहे. ही तर नुकतीच सुरुवात आहे. तुमच्याकडे जर एखादा पाळलेला प्राणी असेल, झाड असेल आणि तुम्हाला त्यांच्याबद्दल अधिक माहिती जाणून घ्यायची असेल, तुमच्याविषयीच्या त्यांच्या भावना जाणून घ्यायच्या असतील तर मी नक्कीच मदत करेन.

**– बागेश्री नाईक**



# Happy Makar Sankranti

Taal

## Taal Academy

Taal Academy of Kathak Dance




**|| Maharashtra Mandal of Detroit ||**

m

MANDAL

# Bhushan Kulkarni & family
## Wishes you

# Happy Makar Sankranti



# Happy Makar Sankranti


SK International

ENGINEERED EXCELLENCE.

## ENGINEERING, DESIGN, AND MANUFACTURING SERVICES

### About Us

SK International, an ISO 9001 certified company, is a leading provider of engineering services and automation solutions. We specialize in custom engineering works and in the making of special purpose machines that are tailored to suit and adapt to all changing requirements. Some of our additional specialties include 3D CAD, Building Information Modeling (BIM), Civil Engineering, Factory Automation, Mechanical Engineering, and Precision Machined Parts.



- 46918 Liberty Drive, Wixom, MI, 48393
- (248) 621-9608
- sales@skinternational.us
- www.skinternational.us

# Happy Makar Sankranti Wishes from


## eHomes Realty



THINKING OF BUYING / SELLING YOUR HOME?

**SUREN GAIKWAD**

BROKER & OWNER, REALTOR

CONTACT US TODAY

**248 289 0307**

CALL FOR EXCLUSIVE LISTING DISCOUNTS AND COMMISSION REBATES!

**SAVE THOUSANDS**




KURRYS
INDIAN CUISINE

24361 Halsted Rd, Farmington Hills, MI 48335
248-826-2014

/kurrysrestaurant
www.kurrys.com



जानेवारीची कुडकुड थंडी बघत असते अंत,
पण तेवढ्यात येते उबदार, गोडगोड संक्रांत.
ओंजळभर काटेरी हलवा त्यात तिळाची वडी
भाकरी-भोगीची भाजी, अन आईची ती काळी साडी
हरभऱ्याचे घाटे, पॅापिन्सच्या गोळ्या, बोरं आणि आवळे
अजूनही आठवतात ते बोरनहाणाचे सोहळे...
बालगोपाळांच्या गराड्यात केलेली लाह्या-बत्ताश्यांची लूट,
पतंगाच्या मांज्याला लावायला केलेला काचेचा कूट.
भाजलेले तीळ नाहीतर खमंग गुळपोळीचा येता वास,
ताज्या होतात संक्रांतीच्या आठवणी खास...

## मराठी परंपरा (Marathi Traditions)




अशा किंवा याहून रंगतदार आठवणी आपल्या मुलांना इकडे सातासमुद्रापार देखील देता आल्या तर?
ह्या विचारातून सुरुवात झाली आमच्या कँटन मराठी शाळेच्या संक्रांतसणाच्या तयारीला.





२३ जानेवारीला सगळी मुलं काळे कपडे घालून शाळेत जमली होती. कार्यक्रमाची सुरुवात सूर्यनारायणाला नमन करून, मुलांना संक्रांतीची वैज्ञानिक, खगोलीय माहिती देऊन केली. मकर राशी, हिवाळा आणि संक्रांत याचा काय संबंध आहे आणि आपल्या पूर्वजांनी थंडीतल्या आवश्यक आहाराची संक्रांतीच्या सणाशी कशी उत्तम सांगड घातली हे एका छोटेखानी Powerpoint presentation मधून मुलांनी जाणून घेतले.




त्यानंतर मुलांनी सुगीची माहिती घेत, भाज्यांची मराठी नावं शिकत-शिकत पारंपरिक सुगड पूजनसुद्धा केले. सुगड म्हणून cauldron pot चा वापर संस्कृतींची सहज सांगड घालून गेला. हरभरे, उसाचे करवे, वेगवेगळ्या भाज्यांची जुळवाजुळव, पालकांनी केलेल्या उत्स्फूर्त स्वयंसेवेमुळे सहज शक्य झाली. हळदी कुंकू, हलवा-तीळवड्या आणि लाडू याचबरोबर एकमेकांना 'तिळगूळ घ्या गोड गोड बोला' अशा शुभेच्छा देत या सुंदर कार्यक्रमाची सांगता झाली.



**– अभिजित जोगदेव**




**– रेवा अभिजित जोगदेव**


Happy Makar Sankranti
Ram Creations
Jewelry & Gifts
FOLLOW US
28974 Orchard Lake Rd
Farmington Hills, MI 48334
248.851.1400 | info@ramcreations.com | www.ramcreations.com

# Wish you all Happy Makar Sankranti








## Happy Makar Sankranti




STELLANTIS
CHRYSLER
CITROËN
DODGE
DS AUTOMOBILES
FIAT
Jeep
LANCIA
Maserati
OPEL
RAM
VAUXHALL
FREE2 MOVE
LEASYS

# *Wishes you*


HAPPY
MAKAR
SANKRANTI

FinesseAcademy

**Confidence Building & Public Speaking Course**

**PROGRAM DETAILS:**

- Session 1 In-person Troy -Wednesdays: Sept 25th - Dec 4th 7-8.30pm
- Session 2 Virtual - Thursdays : Sept 26th - Dec 5th 8-9.30pm
- Session 3 In-person Troy -Saturdays: Sept 28th - Dec 7th 7-8.30pm
- Session 4 In-person Livonia -Sundays: Sept 22nd - Nov24th 2-3.30pm
- Session 5 In-person Livonia -Sundays: Sept 22nd - Nov24th 4-5.30pm
- For more details, contact:

vidhi@finesseacademy.com 313-283-4343

***Happy Makar Sankranti***

MEDSTAR
REHABILITATION SERVICES, INC

**PHYSICIAN'S PREFERRED PROVIDER FOR PHYSICAL,**
*OCCUPATIONAL, AND SPEECH THERAPY*
2050 HAGGERTY ROAD, SUITE 280
CANTON, MI 48187

**PHONE**: 734-844-0800 **FAX**: 734-844-0808
**EMAIL**: MEDSTARREHAB@MEDSTARREHAB.COM

PATEL BROTHERS®

*Wishes you all*




तिळगूळ घ्या, आणि गोड गोड बोला!

# मनोबळ





रानावनात सहलीला गेल्यावर,
मुला-नातवंडांचा तलावातला हैदोस संपल्यावर,
मग हळूच आई पाण्यात अनवाणी पाय बुडवते.
साडीच्या निऱ्या किंचितश्या वर उचलून,
निळ्याभोर लाटांकडे ती अनिमिष नजरेने टक लावून बघते
तेव्हा तिच्या चेहऱ्यावरच्या निर्मल हास्यामागे
उदासीनतेची छटा मला जाणवते..



"आई, पुढच्या वेळी तू सुध्दा पाण्यात उतरायचंस बरं का....
तूच सांगत होतीस ना, लहानपणी छान पोहायचीस तू."
"होय बाळा, किती वर्षं झाली,
आता कुठलं गं पोहणं?
पण ना, कुठेही गेले की पाण्यात पाय मात्र बुडवून येते मी.
डोळ्यांचीच होडी करून खूप दूर, दूर जाते
हातापायांमधलं बळ सरलं गं,
पण मनाच्याच बळावर
दूरदूरच्या देशात जाऊन येते."

**– डॉ. वीणा शाह**





# Proud to Support Those Who Help So Many



HERITAGE
INSURANCE

With best compliments of Heritage Insurance Holdings, Inc.
and *Vijay S. Walvekar*, a Co-Founder and Directior.

heritagepci.com

855-536-2744




# Wishes you all



Law Office of
Leila Freijy PLLC

U.S. Immigration Law

# Wish you Happy Makar Sankranti



# SENSORY REHABILITATION

### OUR VISION

Our vision is to continually seek to be an exceptional, patient-centered healthcare staffing organization that you can always trust.

### OUR MISSION

Our mission is to meet the equitable needs of our clients so that they have the necessary resources to reach their highest potential.

### OUR SERVICES

We are premium provider of various health care services including physical therapy, occupational therapy, speech therapy, and nursing.

## ABOUT US

Healthcare industry works tirelessly to provide exceptional care to everyone in need while facing many challenges. Challenges related to staffing, in particular, have become complex over the years and this is why Sensory Rehabilitation, LLC was established in 2017.
We work to create and develop a supplemental workforce consisting of motivated, talented, and highly-qualified professionals who meet the needs of your patients and facility. We really focus on getting to know you and your organization prior to delivering a provider who is right for both you and your patients.

## WHY CHOOSE US?

- 8 YEARS IN HEALTHCARE STAFFING SERVICES.
- FOSTER A CULTURE OF CARE, TRUST, HONESTY, RESPECT, AND BENEVOLENCE.
- PLACEMENT IN HOMECARE AS WELL AS OUTPATIENTS SERVICES.
- MORE THAN 25+ H1 APPROVAL AND 5 GREEN CARD APPROVALS.

sensoryrehabservices.com
sensory18@gmail.com
4413, Reilly Ct, Troy, Michigan, 48085
248-719-4827



kw CENTRAL
KELLERWILLIAMS.
35427 Dodge Park Rd. Sterling Heights, MI 48312
SELL IN A FLASH, CALL KASH!

**REALTOR®, KASHMIRA DESAI**

**YOUR METRO DETROIT EXPERT**
**View What is *ACTIVE, PENDING & SOLD* in your Neighborhood go to www.kashmira.kwrealty.com**

**Cell (248) 974 6979 Office (248) 655-7955**
**realtor.kashmira@gmail.com**

SRS

Each Keller Williams Office is Independently Owned and Operated

dwarkamai
KITCHEN FOOD

3709 Bristol Drive Troy 48083
**Sushama Mansukh : +1-7347768492 | +1 - 7342337348**
**E:** dwarkamaikitchenfood@gmail.com

**Follow us on:**

Soul
PELVIC FLOOR THERAPY

## Happy Makar Sankranti

**Dr Renu Pathak**

https://soulpelvicfloortherapy.com/

Ph : 248-710-3367


## Happy Makar Sankranti


## Worried about your parents in India?

nila
www.nilacares.com

Care for your family in India with Nila:

- 24X7 emergency assistance
- Dedicated family care manager
- Medical appointment booking
- Regular checkins with family members
- Prescription renewals
- Electronic medical records

एका प्रसन्न पहाटे वरील दृश्य मी कॅमेऱ्याने टिपलं. त्यातल्या चिमणा-चिमणीला झाडावर निवांत बसलेलं पाहून जे वाटलं ते गोष्टी स्वरूपात लिहिण्याचा हा प्रयत्न…

गोष्टीच नाव आहे…"गंमत"



सूर्याच्या पहाट किरणांनी त्याला जाग आली. त्याने डोळे किलकिले करत अलगद बाहेर डोकावले.
"मस्त वातावरण आहे आज." स्वतःशीच पुटपुटला.
"आज शनिवार आहे, झोपू देना. आणि तूही झोप." ती गाढ झोपेत लाडीकपणे त्याला बिलगत म्हणाली.

तो हसला आणि एका कुशीवर होऊन तिच्याकडे पाहत तिच्या डोक्यावरून हात फिरवू लागला. एकटक तिच्या चेहेऱ्याकडे पाहत अगदी सहज उद्गारला,"आज आपल्या लग्नाचा वाढदिवस…आपल्या दोघांना लग्नाच्या वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा".
किती पटकन चालले दिवस, नाही का?
अगदी वाऱ्याच्या वेगाने…

तिच्या प्रेमळ साथीत अमेरिकेत येऊन इतकी वर्ष झाली…पण छे…अस वाटत होतं, काल परवाच अमेरिकेत आलो आहोत. कधी भूतकाळात गेला त्याला कळलंच नाही.




त्याचे मन आठवणींनी सैरभैर झाले,
तिने मनस्वी दिलेल्या साथीची सुखद आठवण झाली.
एकत्र कुटुंबात आणि लाडाकोडात वाढलेली ती.
हसत सहज स्वीकारत आपल्या आयुष्यात सामील झालेली ती.
शून्यातून आपलं स्वतंत्र जग निर्माण करण्याची उर्मी बाळगणारी ती.
जीवन जिंदादिलीने जगायचं असतं असं म्हणणारी आणि तसंच जगणारी ती.
काय नाही हे पाहण्याऐवजी काय आहे त्याची मजा घेत जीवन जगणारी ती.
हो, हीच ती माझी अर्धांगिनी.
त्याचा ऊर अभिमानानं भरून आला आणि नकळत डोळे पाणावले.

त्याला अजूनही आठवत होतं,
एकदा ती हसत आणि अगदी सहजपणे म्हणाली होती,"वेळ जाते रे आणि तशी परिस्थितीही बदलते, यावर माझा ठाम विश्वास आहे. आत्ता आपण करायचे ते "अथक प्रयत्न" आणि बाळगायचा तो "विश्वास". हो, मनस्वी विश्वास एकमेकांवर आणि प्रयत्नांवर." तोही गहिवरला आणि आश्वासक नजरेने मान हलवून म्हणाला होता ,"अगदी तू म्हणशील तसं."

मनमुराद फिरणे, हिंडणे, निसर्गात वेळ घालवणे. एकमेकांच्या सहवासात दिवस छान चालले होते. बघता बघता संसार दोन फुलांनी बहरला. जीवन त्या फुलांना बहरताना पाहण्यात जाऊ लागले.

विचारांच्या खोल समुद्रात नकळत गहिवरून तो उद्गारला,"किती सुखी आहोत ना आपण. खरंतर तुझ्याशिवाय माझं जीवन पूर्णच होऊ शकत नाही." दाटलेल्या कंठाने भरून आलेले डोळे टिपत अलगद त्याने तिचा हात हातात घेतला.



आणि तिला एकदम जाग आली. तिने किलकिले डोळे करून विचारल,"काय बोलत होतास?"

तो सावरून म्हणाला,"काही नाही ग, असंच सहजच."

"अरे, मग हातात हात घेऊन काय म्हणत होतास?" तिने पुन्हा विचारलं.

"बघ ना अगं, ना कसली बंधने, ना कसली चिंता. ना गाडी, ना बंगला. ना शिक्षण, ना परीक्षा, ना कसलं ऋण आणि हो, रोजच सण." त्याने हसत विषय बदलला.

तो गमतीने तिला म्हणाला, "चल आवर."

ती म्हटली,"एवढ्या सकाळी कुठे नेतोयंस?"

समोरच्या झाडाकडे बोट दाखवत तो म्हणाला,"तिथे झाडाच्या शेंड्यावर बसू म्हणजे कोणी पाहणार नाही आपल्याला."

"अरे पण कशाला?" ती म्हणाली.

"चल गं, तुला या माणूस नावाच्या प्राण्याची गम्मत दाखवतो." असं म्हणून त्याने समोरच्या तळ्यात डुबकी मारली आणि झाडाच्या फांदीवर जाऊन बसला.

तिलाही गम्मत वाटली मनात म्हटली,"चला, बघू तरी काय गंमत आहे ती."
त्याच्या शेजारी बसून तीही पाहू लागली सगळी गंमत...अगदी सहज, मजा म्हणून.

"अगं, इथे रोज शाळेच्या बसची वाट पाहणाऱ्या शिस्तबद्ध मुलांना पाहत असतो. खूप मजा येते." त्याने बोटाने इशारा करून सांगितलं.

"आज दिसत नाहीत ती. शाळेला सुट्टी आहे बहुधा. ते एवढी वर्ष का शिक्षण घेतात काही कळलं नाही मला. आपल्याला हा निसर्गच शिकवतो, नाही का? केवढा मोठा शिक्षक आहे तो. ही मुलं निसर्गाकडे पाहतच नाहीत म्हणून शाळेत जात असतील. निसर्गही ते लॅपटॉप वर पाहतात म्हणे." कंटाळून थोडासा आश्चर्यानेच तो सांगत होता.

ती काहीशा अभिमानानेच म्हणाली,”हो, निसर्गाचा खरा आस्वाद तर आपणच घेतो.”



तितक्यात खालून एक गाडी आली.

“श्श्श्श,” त्याने तिला गप्प केले आणि म्हटला, “काही बोलू नकोस. फक्त गंमत बघ माणसाच्या धावपळीची.

गाड्यामागून गाड्या धावू लागल्या होत्या. काही आत तर काही बाहेर वेगाने पळत होत्या.


“आपण जन्माला आल्यापासूनच निसर्गाने स्वच्छंदी उडण्याची आणि आनंदाने गगनविहार करण्याची शक्ती दिलीये. हवं तिथे हव्या त्यावेळी जाऊ शकतो. नाहीतर ही माणसं बघ. किती रे हे आयुष्य फक्त धावपळ करण्यात वाया घालवतात. या निसर्गाने जी अलौकिक क्षमता दिली, कधी रे कळणार त्यांना?”


“खरंच, कधीतरी ते जीवन जगतील कारे आपल्यासारखं, स्वच्छंदी?” तिच्या या प्रश्नाने मात्र दोघेही गप्प झाले आणि पाहू लागले “गंमत” या माणसाच्या आयुष्याची, झाडाच्या उंच शेंड्यावरून निवांतपणे...

**– उमेश पवार**






EXPERIENCE THE LIFE
MI ADVENTURES'23
Kailash Mansarovar Parikrama (KMP)
EVEREST BASE CAMP-NORTH SIDE
JOURNEY OF A LIFETIME
Kailash Mansarovar Parikrama is a transformational spiritual journey.
MI Adventures'23 will not only organize trip but also physically prepare you to take on this spiritual journey.
Opportunity to visit iconic Everest Base Camp (EBC-Northside)
Organized by
MI Adventures'23
Timing & Duration
Sept'25
18 Nights/19 Days
Contact
Pankaj Dahad
248 854 2092
Join us on


EXPERIENCE THE LIFE
MI ADVENTURES'23
Mt . Kilimanjaro
Mount Kilimanjaro at 19,341 ft/ 5895 mts is the tallest freestanding mountain in the world. MI Adventures' 23 will not only organize trek but also physically prepare you to take on the extremely demanding and challenging trek.
Organized by
MI Adventures'23
Timing & Duration
July'25
10 Days/9 Nights
Contact
Pankaj Dahad
248 854 2092
Join us on


shilp
ENTERTAINMENT
Wishes you
Happy
Makar
Sankranti

REMERICA
INTEGRITY II REALTY

**SureshHomes.com**

(734) 394-9981
soldbysuresh@gmail.com




**Call me today - for FREE market analysis and move with Suresh**



SFR SHORT SALES & FORECLOSURE RESOURCE · EQUAL HOUSING OPPORTUNITY · REALTOR® · MLS

For more information call

## SURESH VALSANGKAR

Multi Million Dollar Producing REALTOR/ Notary Public

(734) 394-9981

41000 SEVEN MILE RD. I SUITE 105 I NORTHVILLE, MI 48167

- Over 29 years experience
- Multi Million Dollar Producing Realtor®
- Full time Realtor

# Thinking of Purchasing a Home??



No matter if you are buying your first home, moving across town or refinancing, Capital Mortgage Funding is here to help. We offer mortgage choices that can help make home ownership more affordable with the speed and service you deserve.

- Fixed- and adjustable rate mortgages (ARMs)
- FHA, VA, Jumbo and Conventional loans
- Loans for first time homebuyers
- As low as 3% down
- Refinancing options



## Call me today!

CAPITAL MORTGAGE FUNDING
The Best Mortgage Banker
Powered by CMG HOME LOANS SIMPLIFIED. TRUSTED. COMMITTED.



**Ron Jacobs**
**Senior Loan Officer**
**NMLS#112741 | Branch NMLS# 2562040**
**Phone: (248) 821-7020**
**rjacobs@cmghomeloans.com**
**www.capitalmortgagefunding.com**
**Licensed: MI**

*Click here to download my app!*

Capital Mortgage Funding is powered by CMG Home Loans, NMLS ID# 1820. CMG Mortgage, Inc. dba CMG Home Loans, NMLS ID# 1820 (www.nmlsconsumeraccess.org), is an equal housing lender. Regulated by the Division of Real Estate. Georgia Residential Mortgage Licensee #15438. Ohio Mortgage Broker Act Mortgage Banker Exemption #MBMB.850204.000. Licensed by the NJ Department of Banking and Insurance. Registered Mortgage Banker with the Texas Department of Savings and Mortgage Lending. Licensed by the Virginia State Corporation Commission #MC-5521. To verify our complete list of state licenses, please visit www.cmgfi.com/corporate/licensing112741, 17170 W. 12 Mile Road Southfield, MI 48076 (JN#1281606811)

State Farm

- **TROY**

2916 E LONG LAKE RD, TROY, MI 4808

PH – 248-250-9708

JAYMUNJ.COM

- **ROCHESTER**

1461 N ROCHESTER RD, ROCHESTER HILLS, MI 48307

PH – 248-218-2526

AGENTJAYMUNJ.COM



# JAY MUNJ STATE FARM.



Travel mugs, bottle, coffee mugs
CUSTOMIZE YOUR APPAREL
T-Shirt, Hats, Sweatshirts, Golf Shirts, ETC.
-Embroidery
-Screen Printing
-Full-Color Printing
-Vinyl Names & Numbers
SAMI'S ENGRAVING & GIFTS
PERSONALIZED HOLIDAY GIFTS, & MORE...
Plaques
Trophies & Medals
Desk Clock
Full Color Mugs
Cutting & Serving Board
Rosewood Finish Martini Set
3-Piece BBQ Set
Corporate Gifts, Custom Engraving, Promotional Products
Visit us online or in store for more gift options and varieties
samisgifts@gmail.com | (248)-250-4931 • www.samisgifts.com • 4935 Rochester Rd, Troy, MI 48085




ROSHAN PATHRE
REAL ESTATE AGENT
LICENSED RESIDENTIAL & COMMERCIAL REALTOR®
MICHIGAN POWER BROKERS
(248) 925-8524
roshanpathrerealestate@gmail.com
Contact me today for all your Real Estate needs!
MPB
MICHIGAN POWER BROKERS
REALTOR

FORTUNE FOREVER


FINANCIAL SERVICES



Wishes you all



## महाराष्ट्रातील प्रसिद्ध पदार्थ



**मोदक**, हा गोड खाद्यपदार्थ आहे. महाराष्ट्रामधे गणपतीला मोदकांचा नैवेद्य दाखविला जातो. मोदक यामध्ये मोद असा शब्द आहे, जो पदार्थ खाऊन आनंद मिळतो त्याला "मोदक" असे म्हणतात. मोदक हे 2 प्रकाराचे बनवतात. उकडीचे आणि तळलेले.

महाराष्ट्राची एक खासियत म्हणजे **पुरणपोळी**. कोणत्याही मराठी सणावाराच्या वेळी मराठी माणसाच्या घरात गोडाधोडाचा बनणारा पदार्थ म्हणजे पुरणपोळी. हा पदार्थ जितका दिसायला व खायला चांगला असतो, तितका तो करायला कठीण असतो.




## महाराष्ट्रातील पर्यटन स्थळ

**महाबळेश्वर** हे महाराष्ट्रातील निसर्गरम्य पर्यटन स्थळ आहे. सह्याद्रीच्या पठारावर वसलेल्या या ठिकाणी चांगली घनदाट झाडे आहेत. हे शहर वळणदार रस्ते, स्ट्रॉबेरी फार्म आणि सुखद हवामानासाठी ओळखले जाते. **कोकण** मुंबई पासून गोव्यापर्यंत किनाऱ्यावर पसरलेल्या या कोकणात सुंदर समुद्र किनारे आहेत. कोकणातील रत्नागिरी हे शहर हापूस आंब्यासाठी प्रसिद्ध आहे. कोकणाची भूमी अपार निसर्ग सौंदर्याने नटलेली आहे. आंबे, सुपारी, केळीच्या बागा, फणस, काजू, कोकम, भात हे तिथे पिकवतात.

## महाराष्ट्रातील प्रसिद्ध खेळाडू

**सचिन तेंडुलकर** हा क्रिकेट विश्वात जागतिक स्तरावर सर्वोत्तम मानला जाणारा खेळाडू आहे. क्रिकेट मधे सर्वाधिक १०० शतके आणि सर्वाधिक धावांचा विक्रम त्याच्या नावावर आहे. २०११-च्या विश्वचषक विजेतेपदात त्याने सिंहाचा वाटा उचलला होता.

**अंजली भागवत** ही एक भारतीय नेमबाज आहे. तिला ISSF-चा चॅम्पियन ऑफ चॅम्पियन्स हा पुरस्कार मिळाला. २००३ मधे तिने पहिला विश्वचषक जिंकला.

— निहिरा नाईक


GLOWING SMILES DENTAL
Dr. Kulbir (Nikki) Jassal, D.D.S.
1755 W Big Beaver Rd,
Troy, MI 48084
(248) 643-7530
www.glowingsmilesdental.com


JAYA
TRAVEL & TOURS
Jaya Travel agents speak your language
Including Hindi, English, Gujarati, Tamil, Malayalam, Marathi, Spanish, Punjabi, and more
Call us today at 1-877-359-5292

# Happy Makar Sankranti



Sistar Mortgage
Company
A Nationwide Lender




Great Cars.
Great Sales.
Great Service.
Two great locations with more brands ready to serve you!
SERRA
FORD ROCHESTER HILLS
Ford
serrafordrochesterhills.com
2890 S Rochester Rd., Rochester Hills, MI 48307
Direct: 248.852.0400
SERRA
BUICK GMC ROCHESTER HILLS
BUICK GMC
serrabuickgmcrochesterhills.com
855 S Rochester Rd., Rochester Hills, MI 48307
Direct: 248.651.5500



# Happy Makar Sankranti



RASNA

FOODS

# हा चंद्रधनूचा खेळ

हो, अगदी बरोबरच वाचताय तुम्ही- चंद्रधनूच- इंद्रधनू नव्हे. या चैत्री पौर्णिमेच्या रात्री शीतल चंद्रप्रकाशात, व्हिक्टोरिया फॉल्सच्या तुषारांच्या वर्षावात हे नवल बघायला मिळालं. हे असं, भर रात्री, चंद्रप्रकाशात इंद्रधनुष्य दिसतंय हे मी कुठेतरी ऐकलं/वाचलं होतं. ते आपल्याला बघायला मिळावं ही एक सुप्त इच्छा मी मनाच्या सात पेट्यांच्या आत केवड्याच्या पानासारखी जपून ठेवलेली असणार- काही गोष्टी व्हायच्या असल्या की होतातच ना? म्हणूनच, धबधब्याच्या प्रवेशद्वारावरच्या प्रचंड गर्दीतसुद्धा "आज रात्री साडेआठ वाजता चंद्रधनुष्य दिसण्याची शक्यता आहे. या पायी सफरीसाठी बरोबर आठ वाजता येथेच जमावे." अशी तळहाताएवढ्या चतकोर कागदावर बारीक अक्षरात लिहिलेली नोटीस मलाच कशी दिसली असती? पण ती बघितल्याबरोबर ही सुवर्णसंधी- नव्हे - रजतसंधी चुकवायची नाहीच असे आम्ही ठरवून टाकले.



हा अतिप्रचंड धबधबा डॉ. डेव्हिड लिव्हिन्गस्टन यांनी "शोधून" काढला. हा स्कॉटिश मिशनरी डॉक्टर एकोणिसाव्या शतकात लंडनहून येऊन सर्वस्वी अपरिचित अशा आफ्रिका खंडात धैर्याने फिरला. झम्बेझी नदी व तिच्यावरील हा धबधबा स्थानिक टोळ्यांच्या मदतीने पाहणारा पहिला युरोपियन. त्या आधी हा "मोसी ओआ टुन्या" म्हणजे "गडगडाट करणारा धूर" म्हणून प्रसिद्ध होता. लिव्हिन्गस्टन साहेबांनी अर्थातच त्या वेळच्या इंग्लंडच्या राणीचे नाव त्याला चिकटवून टाकले. थोडी रुग्णसेवा, थोडा ख्रिस्ती धर्मप्रसार, स्थानिक टोळीप्रमुखांशी मैत्री, त्यांच्या भाषेशी परिचय, वगैरे अनेक उद्योग सहनशीलतेने करीत कित्येक वर्षे आफ्रिकेत ते वणवण फिरले. काही वर्षे संपूर्णपणे मागमूस नसतांना हेन्री स्टॅन्ले या दुसऱ्या धाडसी प्रवाशाने "डॉ. लिव्हिन्गस्टन? माझी नक्कीच खात्री आहे" अशा प्रसिद्ध शब्दांमध्ये त्यांची ओळख पुन्हा करवून घेतली.

दिवसभर आम्ही हे "धबाबा आदळे तोय" डोळ्यांमध्ये साठवत वेगवेगळ्या थांब्यांवरून खूप खूप भटकलो. स्वच्छ सूर्यप्रकाशात त्यावर नाचणारी इंद्रधनुष्ये कॅमेऱ्यात बंदिस्त करून घेतली. धबधब्याच्या तुषारांमुळे तयार झालेल्या पर्जन्यारण्यात कितीतरी पक्षी व अनोळखी वनस्पती मन:तृप्ती होईपर्यंत बघितल्या. लिव्हिन्गस्टन साहेबांच्या पुतळ्यापाशी थांबलो तेव्हा बराच आदर तर वाटलाच, पण बरोबरच्या मार्गदर्शिकेने सांगितले की "गेली तीन-चार वर्षे २१ जूनला येथे आम्ही योग दिवस साजरा करतो" हे ऐकून नसलेली कॉलर ताठ झाली.

रात्री बरोब्बर आठ वाजता आम्ही व्हिक्टोरिया फॉल्स नॅशनल पार्कच्या फाटकाजवळ पोहोचलो. मला वाटले होते की खूप गर्दी असेल, पण प्रत्यक्षात फक्त बारापंधरा लोकच तेथे घोटाळत होते. कारण... पत्रकाच्या शेवटी अजूनही बारीक अक्षरात लिहिले होते.... “हे अद्‌भुत दृश्य बघण्यासाठी खास वाटाडे नेमावे लागणार आहेत. त्यासाठी प्रति-माणसी शंभर डॉलर्स हा दर आकारावा लागेल ".... असो. आत्तापर्यंत माझी उत्सुकता इतकी शिगेला पोहोचली होती की मी हजार डॉलर्स भरून सुद्‌धा जायला तयार होते. (नशीब, डाव्या हाताची किंवा उजव्या पायाची करंगळी गहाण ठेवायला लागेल अशी मागणी नव्हती.)

पूर्वेला पौर्णिमेचा चंद्रोदय झाला. शीतल चंदेरी पूर्णचंद्र. आता आम्ही समस्त मंडळी अस्वस्थ होऊ लागलो. तेवढ्यात दोघे पार्क रेंजर आनंदी चेहेऱ्याने भराभर चालत आले- "आज आपल्याला चंद्रधनुष्य दिसणार! तुम्ही सर्वजण अतिशय भाग्यवान आहात. धबधब्यावर फारसे धुके नाही, त्यामुळे अगदी स्पष्ट दिसते आहे चंद्रधनुष्य. आता माझ्या मागून, पायवाटेवरूनच सगळ्यांनी शिस्तीत चालायचं. उगीच इकडे तिकडे रेंगाळू नका. इथे केव्हाही, काहीही होऊ शकतं. ही भूमी प्रथमतः इथल्या आदिम प्राण्यांची आहे, आपण उपरे."बोलता-बोलता वाटाड्या वाकला आणि त्याने पायांमधले जोडे आणि पायमोजे दोन्ही काढून टाकले. आम्ही चकितच झालो. आफ्रिकेच्या अरण्यात भर रात्री हा गडी असा अनवाणी पायांनी चालणार?

"पाय जमिनीवर टेकले की मला आपण या भूमीच्या अगदी जवळ आहोत असे वाटते."

"पण... साप, विंचू, काटे-कुटे त्यांचे काय?"

"हात्तिच्या, आपल्या चाहुलीने नाग- साप- विंचू सगळे पळून जातात. काळजी करू नका, मी इथलाच आहे, मला आवडतं असंच चालायला."

मग पुढे एक रेंजर, मागे एक रेंजर, प्रत्येकाच्या हातात छोटा टॉर्च अशी आमची वरात बांधीव पायवाटेवरून चालू लागली. हळू हळू कोसळत्या पाण्याचा घनगंभीर आवाज ऐकू येऊ लागला व पायांना धरणीची कंपने जाणवू लागली. आणि अचानक आपण पन्नास साठ वर्षांपूर्वीचा कृष्णधवल सिनेमाच बघत आहोत असं दृश्य डोळ्यांसमोर साकार झालं .... तो प्रचंड शुभ्र प्रपात, खालून धुक्याच्या पांढऱ्या, राखी लाटा, वर काळंभोर आकाश, त्यामध्ये पूर्ण तेजाने तळपणारा पूर्णचंद्र- आणि चंद्रधनुष्याची भव्य कमान- ती सप्तरंगात नाही, तर श्वेत-कृष्ण या दोनच रंगांच्या विविध छटांमध्ये! दिवसा हीच धनुष्ये कशी सूर्यप्रकाशात सातही रंगांनी झळझळत होती- आता त्यांची शोभा अगदी वेगळीच, प्रौढ आणि परिपक्व वाटत होती. ही तर एक श्वेतवसना, सुस्नात लावण्यवती होती, जिचा सुरंगी शृंगार अजून सुरु होणार होता.
हा कृष्णधवल चंद्रधनुष्याचा नवल नयनोत्सव आम्ही डोळे भरून स्मृतिकोशात बंदिस्त करून घेतला व जमेल तसा कॅमेऱ्यात साठवून ठेवला. हे म्हणजे "आम्ही सूर्य बघितला, तो साधारण या काजव्यासारखा दिसत होता" असे त्या चिमुकल्या प्रतिमा दाखवून फुशारकी मारण्यासारखेच होते.

कितीतरी क्षण तो धबधबा, ते चंद्रधनू आम्ही अनिमिष नजरेने डोळ्यात साठवून घेत स्तब्ध उभे होतो. कधीतरी क्वचित असे गदगदून येते ना, की वाटते आता आयुष्याची परमसीमा झाली आहे, यापुढे काही शिल्लक नाही. हा असा एक क्षण अनुभवायला मिळाला म्हणून मी भरून पावले.

**– डॉ. वीणा शाह**



***तिळगूळ घ्या,***
***आणि गोड गोड बोला!***

*5% Discount for MMD Members*











Selling or buying a home is perhaps the single largest transaction most of us will make in our lifetime.

Allow me the privilege of helping you with this decision.



***Prasanna Mohanachandran***

***REALTOR***

Office : (248) 524-1600
Mobile: (248) 670-1943
Fax : (248) 524-1427
***pm.tcagents@gmail.com***

**Call now (248) 670-1943 (Cell)**






OAKLAND ORTHODONTICS

Dr. Archana Dhawan, DDS, MS
ABO Board Certified Orthodontist
2789 Rochester Rd.
Troy,MI 48083
Phone: 248-817-2623 Fax: 248-688-9528
Web: https://www.oaklandorthodontics.com/

**HONEST**

SKIP THE LINE, ORDER ONLINE

SCAN ME

TROY MI

248.315.0234

## Wishes you all Happy Makar Sankranti




**FIVE OAKS DENTAL**

Avneet Dhaliwal, DDS

We are a family dental office in Livonia, with focus on providing top quality care to all our patients in our spacious and modern office in Livonia. Accepting new patients now and children are welcome 🙂

Looks us up and book your appointment right away on

WWW.FIVEOAKSDENTAL.COM


FOR ALL YOUR MORTGAGE NEEDS
VM
VEMA MORTGAGE LLC
SEBASTIAN GEORGE
Mortgage Broker
Contact me for a free rate quote
1-877-800-VEMA (8362)
saaby74@vemamortgage.com
We are open 24 X 7, 365 days a year


Shree's Boutique
Shree's Boutique
Sai Florist
Sai florist
Exclusive Collection of Jewelry & Clothing
All Indians Flowers, Garlands & Pooja Needs
Contact:
Vimala Kumarasamy, 174 W Maple Road, Troy, MI 48084
Mon-Fri 10.30 am to 02.00 pm & 05.00 pm to 08.00 pm
Saturday 10.30 am to 08.00 pm & Sunday 10.30 am to 06.00 pm
(309) 750 9374 & (248) 781-5460
shreesboutiqueusa
Shree's Boutique LLC
shreesboutique.com
saiflorist.com

# मी आणि *My* मराठी!

“You are as many a person as languages you know.” अशी एक अमेरिकन म्हण आहे. या न्यायाने खरंतर आपण सगळेच भारतीय म्हणजे 'dual personality disorder' ची उदाहरणेच म्हणायला हवीत!

कमीतकमी आपली मातृभाषा आणि हिंदी/इंग्रजी तर आपल्याकडे सगळ्यांनाच येत असतात.




माझ्या बाबतीत हा “आजार” जरा गंभीरच म्हणायला हवा (नवरा नक्कीच या वक्तव्याचे समर्थन करेल!). तर... लहानपणापासूनच 'भाषा' विषय माझ्या आवडीचा. आजवर इंग्रजी, हिंदी, संस्कृत, कारवारी - कोकणी, फ्रेंच, जपानी या भाषा आत्मसात करायचा मी प्रयत्न केला. काही फसले, काही यशस्वी झाले. माय मराठी तर होतीच! शाळेत असल्यापासून मराठी कथा - कविता अगदी तोंडपाठ! त्यात वडिलांची सरकारी नोकरी आणि त्यामुळे दर तीन वर्षांनी होणाऱ्या बदल्या यामुळे माझ्या मराठीवर अनेक बोलीभाषांचे संस्कार होत गेले. सांगली-कोल्हापूरचं "खावा/ जावा/ चालतंय की"; मराठवाड्यातील "कळंना, बसंना, थांबंना" माणदेशी मराठीतील "काय करायलास/ चाल्लास /खायलास बे" मिळून "my बोली" बनत गेली. यथावकाश शिक्षणासाठी पुण्यात ६-७ वर्ष राहणं झालं त्यामुळे प्रमाण भाषेचे संस्कारसुद्धा झाले बरं! शाळा संपली तसं मराठी "अभ्यास विषया"च्या यादीतून आपोआपच बाहेर पडलं. वाचनाची आवड असल्यामुळे कविता, कथा, कादंबऱ्या यातून मराठीच्या भव्य दिव्य, व्यापक स्वरूपाचं दर्शन घडत राहिलं.  मात्र, जसं जसं वय वाढत गेलं, तसं तसं माझ्यातलं आणि महाराष्ट्रातलं भौगोलिक अंतर वाढत गेलं आणि कानावर पडणारं मराठीसुद्धा कमी कमी होत गेलं. आजवर जगाच्या नकाश्यावरचं बरंच अंतर पार केलं, नवनव्या जागा पाहिल्या, मुक्काम थाटले, मुक्काम उठवले. या प्रवासात मराठी सोबत होतीच - घरातील संवाद भाषा म्हणून! तिचा विसर मुळीच पडला नाही पण कुठेतरी तिचं असणं गृहीत धरलं गेलं होतं.

योगायोगाने गेल्यावर्षी ट्रॉय मराठी शाळेत शिक्षिका म्हणून रुजू झाले आणि मराठी माझ्या अभ्यास-विषयाच्या यादीत नव्याने आली. खरंतर, मी भाषा शिकवायला तिथे जाते पण माझ्या छोट्या दोस्तांचे प्रश्न इतके भन्नाट असतात की मलाच घरी येऊन अभ्यास करावा लागतो! "वादळ म्हणजे storm तर मग hurricane, tornado ला काय म्हणतात?" "मराठीत अक्षरावर रेष का देतात?" " खऱ्या, बऱ्या सारख्या शब्दात 'र' हे अक्षर आडव्या रेषेने का दाखवतात?" "उपद्व्याप ला exact इंग्लिश शब्द काय?" "बेडकाचा आवाज मराठीत "डराव डराव" आणि इंग्लिश मध्ये "ribbit ribbit" असं का?" ‘मी गेलो’ - हे पुल्लिंगी रूप तर मग स्त्रीलिंगी रुप ‘मी गेले’ असं का, ‘मी गेली’ असं का नाही? अशा कितीतरी प्रश्नांची उत्तरे देता देता नुसती तारांबळ उडते.

मला काहीकाळ इंग्रजी आणि जपानी भाषा शिकवण्याचासुद्धा अनुभव आहे पण इतकी फजिती हे विषय शिकवताना कधीही होत नाही; कारण या भाषांकडे 'विषय' म्हणून पाहत आले, शिकत आले.  मराठी तशी विनासायासच उमगत गेली, आपसूक आली. मातृभाषा शिकताना आधी व्याकरणाचे नियम शिकून मग आपण भाषा शिकलो नाही. त्यामुळे 'असं का?' असे प्रश्न फारसे पडलेच नाहीत. ‘हे असंच असतं’ असं आपण गृहीत धरतो.

आता हेच बघा ना, Macaroni and Cheese किंवा Clam Chowder सारखा अमेरिकन पदार्थ बनवताना आपण साहित्य मोजून, मापून घेतो, कोणतं साहित्य कधी, कसं आणि त्याच क्रमाने का घालायचं हे समजून घेऊन मग बनवतो. चार चार वेळा त्याची कृती वाचतो. पण "जरा पिठलं कर गं" असं कोणी सांगितलं की ‘मसल’ मेमरीने आपोआप आपल्या हालचाली घडू लागतात.

कोणत्याही मोजमापाशिवाय सुद्धा काही मिनिटातच खमंग पिठलं तयार! हो ना? आणि मग कोणा नवशिक्याने साहित्याचं प्रमाण इतकंच का? क्रम असाच का? असे प्रश्न विचारले की  आपल्याला उत्तर सुचत नाही. आजवर इतक्यांदा पिठलं खाऊन, बघून, करून या गोष्टी इतक्या अंगवळणी पडलेल्या असतात की पिठल्याचं तसं असणं आपण गृहीतच धरलेलं असतं. असो.

तर, सांगायचा मुद्दा हा की मराठी शाळेतील माझ्या छोट्या मित्र-मैत्रिणींमुळे मीही माझ्या भाषेकडे नव्या दृष्टिकोनातून, अधिक चिकित्सकपणे पाहू लागले आहे.

“A child in their ‘why’ era will make you realize how much you don't know!” असं म्हणतात ते काही खोटं नाही. मुलांच्या प्रश्नांच्या निमित्ताने जितक्या खोलात जाऊन मी मराठीचा पुन्हा नव्याने अभ्यास करू लागले आहे तितकीच -

"माझ्या मराठीची थोरी नित्य नवें रूप दावी
अवनत होई माथा मुखीं उमटते ओवी!"
याची अनुभूती येते आहे.




**– विभावरी देशपांडे**





## तिळगूळ घ्या,
## आणि गोड गोड बोला!






## GLOBAL SUPPLIER OF COATINGS FOR PLASTICS AND METALS



Dhake Industries offers a wide range of products for Interior and Exterior Automotive Applications as well as other Non-Automotive Applications. Our products are custom formulated to meet the most stringent requirements of any market

- Known in the Industry for Unsurpassed Technical Capabilities
- Leader in Metallic Paint Development for Auto Interiors
- Rapid Product Development with Custom Formulations to Meet Market and Customer Specific Requirements

**Various Paint Technologies**

- 2K Monocoat
- 2K Base/Clear
- 1K Waterbase
- 2K Waterbase
- One-Coat over TPO/PP
- Adhesion Promoters
- Laser-Etchable Coatings
- Soft-Touch Coatings
- Chrome-Look Coatings
- In-Mold Coatings
- Hydrographics Clearcoats
- Metallic Coating Finishes
- Non-Metallic Coating Finishes
- Much Much More…

Dhake Industries

Please contact us for more information ▸▸▸

**Global Headquarters**
15169 Northville Rd.
Plymouth, MI 48170
734-420-0101
www.dhakeindustries.com

“आपले मंडळ ”

|| *Maharashtra Mandal of Detroit* |

# संक्रांत

विशेषांक

तिळगूळ घ्या आणि गोड गोड बोला !



महाराष्ट्र मंडळ डेट्रॉईट

एकमेका सहाय्य करु, अवघे धरु सुपंथ

जानेवारी २०२५